॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

**✲ सुविचार ✲**

सौम्य शब्दांनी कठोर हृदयं देखील जिंकता येतात.




■ अहिल्यानगर ■ सोमवार, दि. १९ मे २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३७ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

# मान्सून वाऱ्याच्या वेगाने दाखल होणार

## यंदा भरपूर पाऊस । हवामान खात्याचा अंदाज

● **पुणे । वीरभूमी–**

केरळात वा-याच्या वेगाने दाखल होणारा मान्सून यंदा महाराष्ट्रातही लवकर दाखल होणार आहे. केरळमध्ये अंदाजे २७ मे रोजी मान्सून (चार दिवस कमी-अधिक) दाखल होईल, अशी सरासरी तारीख अपेक्षित धरली तरी राज्यात मान्सून कोणत्या क्षणी दाखल होईल, अशी तारीख देता येत नाही. त्यास अनेक कारणे असले तरी यंदा राज्यात मान्सून भरभरून कोसळणार असल्याचे संकेत आहेत.

यंदाच्या चार महिन्यांत प्रत्येक महिन्याला, प्रत्येक आठवड्याला पाऊस चांगला असेल, असे गृहीत धरणे योग्य नाही. कारण, विस्तृत पूर्वानुमान गृहीत धरले असले तरी शेतकऱ्यांनी कृषी विभागाशी समन्वय ठेवून शेतीच्या कामाचे नियोजन करणे अपेक्षित आहे. रेड, ऑरेंज अलर्टवर शेतकऱ्यांनी लक्ष ठेवणे गरजेचे आहे. तीन ते चार तासांच्या पावसावरही शेतकऱ्यांनी लक्ष ठेवून स्वत:ची आणि पशुधनाची काळजी घेणे गरजेचे आहे. कृषी विभाग आणि हवामान विभाग यांची जोड कायमच शेतकऱ्यांसोबत असून आता हवामान विभागाने ब्लॉकस्तरीय अंदाज आणि पंचायत स्तरावर सल्ले देण्यास सुरुवात केली आहे.

मौसम ॲप, मेघदूत ॲप आणि दामिनी ॲपसारखे अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरतानाच शेतकऱ्यांनी थोडासा माहिती तंत्रज्ञानाची जोड घेण्याची गरज आहे. जेणेकरून पावसाचा खंड आणि पावसाचे वितरण शेतकऱ्यांना मोबाइलवर शक्य आहे. हवामान विभागाचा मानस प्रत्येक गोष्ट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे हा आहेच. मात्र संपूर्ण चार महिने पाऊस कसा असेल? हे सांगता येत नाही. कारण, पावसाचे टप्पे असतात. जून महिना हा संक्रमणाचा काळ असतो. जुलै आणि ऑगस्ट हे दोन



महिने महत्त्वाचे असतात. त्यामुळे शेतकऱ्यांनी हवामान विभागाशी संपर्क राहून शेतीचे नियोजन केले पाहिजे.

यंदा पाऊस चांगला आहे ही चांगली बाब आहे. तसे पूर्वानुमान आहेच. मात्र, ते शेतकऱ्यांपर्यंत कधी कधी पोहोचत नाही, ही वस्तुस्थिती असली तरी शेतकऱ्यांनी स्वयंघोषित हवामान तज्ज्ञांवर अवलंबून राहण्यापेक्षा आयटीची जोड घेत शेतीचे नियोजन करणे गरजेचे आहे. दरम्यान, आता मान्सून मॉड्यूलनुसार, यंदा मान्सून जून महिन्याच्या अखेरपर्यंत राज्य व्यापले, असा अंदाज आहे. शिवाय यंदाच्या मान्सून अल निनो नाही. ला निना आता न्यूट्रल झाला आहे. या सगळ्या गोष्टी तटस्थ असल्या तरी ग्लोबल मॉड्यूल असे दर्शवित आहेत की पावसाचे चार महिने चांगले असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### शेतकऱ्यांना दिलासा

■ यंदा राज्यातील शेतकऱ्यांना चांगल्या पावसाचा आधार आहे. शेतकऱ्यांनी हवामान विभागाकडून माहिती घ्यावी. दिशाभूल करणारी माहिती घेऊ नये. शेतीच्या कामासाठी आयटीची जोड घ्यावी. यंदाचा मान्सून शेतकऱ्यांसाठी फलदायी ठरेल, ही शक्यता नाकारता येत नाही. विदर्भ, मराठवाडा, खान्देश, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणातील शेतकऱ्यांना निश्चित यंदा चांगला पाऊस असून तो फास्ट ट्रेनसारखा असणार आहे यात तिळमात्र शंका नाही.

## SPOT NEWS

### मराठा संघटनांची आज बीड बंदची हाक

● **बीड** – परळी तालुक्यातील लिंबोटा गावातील तरुण शिवराज दिवटे याला सप्ताहात झालेल्या किरकोळ वादावरून १९ ते २० तरुणांनी काठी,बेल्ट आणि रॉडने मारहाण केली. या प्रकरणामध्ये मराठा संघटना आक्रमक झाल्या असून त्यांनी सोमवार दि. १९ मे रोजी परळी आणि बीड बंदची हाक दिली आहे. शिवराजला मारहाण करणाऱ्या सात जणांना अटक करण्यात आली आहे. मात्र, आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करा आणि मारहाणीमध्ये सहभागी असलेल्या इतरांना अटक करा यासाठी लिंबोटा गावातील ग्रामस्थ आक्रमक झाले. त्यांनी बीड-परळी मार्गावर ठिय्या आंदोलन केले. जोपर्यंत मागण्या मान्य मान्य होणार नाहीत तोपर्यंत मागे हटणार नसल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. मनोज जरांगे हे आज बीडच्या दौऱ्यावर आहेत. ते देखील रुग्णालयात जाऊन शिवराज दिवटेची भेट घेणार आहेत. दरम्यान, शिवराजला मारहाण करणाऱ्या सचिन मुंडे, ऋषिकेश गिरी, रोहन वाघुळकर, समाधान मुंडे, आदित्य गित्ते यांच्यासह दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले आहे.

### आजपासून अकरावीची ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू

● **मुंबई** – संपूर्ण राज्यात आजपासून अकरावीची ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू होत आहे.राज्यातील अकरावी प्रवेश प्रक्रिया यंदा पूर्णपणे ऑनलाइन करण्यात आली आहे. १९ ते २८ मे दरम्यान विद्यार्थ्यांना यासाठी अर्ज करता येणार आहे. शिक्षण विभागाने https://mahafyjcadmissions.in या संकेतस्थळावर केंद्रीकृत प्रणाली उपलब्ध करून दिली आहे. विद्यार्थ्यांना अर्जासाठी १०० रुपये शुल्क भरावे लागेल. याआधी ऑफलाइन अर्जासाठी हजारो रुपये मोजावे लागत होते. आता एकाच पोर्टलवरून १० कॉलेजसाठी अर्ज, डाक्युमेंट अपलोड, गुणवत्तानुसार गुणवत्ता यादी, आणि प्रवेश फेऱ्यांचे वेळापत्रक मिळणार आहे. प्रवेश प्रक्रिया पारदर्शक व संगणकीकृत असून कोणताही गैरव्यवहार होणार नाही. विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी विभागीय कक्ष व हेल्पलाइन (८५३०९५५५६४) आणि supportmahafyjcadmissions.in या ईमेलवर मार्गदर्शन उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी ऑनलाइन प्रवेशासाठी किमान १ आणि जास्तीत जास्त १० प्राधान्यक्रम भरावे लागतील.

## हेरगिरी प्रकरणी युट्यूबर ज्योती मल्होत्राला अटक

● **नवी दिल्ली । वीरभूमी–**

हरियाणाच्या हिस्सारमधून ज्योती मल्होत्रा नावाच्या यूट्यूबरला अटक करण्यात आली आहे. पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याचा ज्योती मल्होत्रावर आरोप आहे. ज्योती मल्होत्रा ही पाकिस्तानच्या हाय कमिशनमध्ये कार्यरत असलेल्या दानिश नावाच्या अधिकाऱ्यांच्या संपर्कात होती. दानिशने ज्योतीला पाकिस्तानातही पाठवले होते. पाकिस्तानात जाऊन तिने गुप्त माहिती पुरवल्याचे उघड झाले. दरम्यान, आतापर्यंत पंजाब आणि हरियाणातून ६ पाकिस्तानी हेरांना अटक करण्यात आली आहे.

ज्योती मल्होत्राच्या इन्स्टाग्रामच्या अकाऊंटवरुन एक मोठी माहिती समोर आली. पहलगाम दहशतवादी हल्ला व्हायच्या एक महिना आधी ज्योती श्रीनगर आणि पहलगाममध्ये गेली होती. त्यानंतर मार्च महिन्यात ती पाकिस्तानात गेली होती. २०२३ साली ती पाकिस्तानच्या उच्चायुक्तालयामध्ये गेली होती. पाकिस्तानला जाण्यासाठी तिला व्हिसाची गरज होती. त्या ठिकाणी दानिश या अधिका-याशी ओळख झाली आणि नंतर त्यांचा मोबाईलवर संपर्क वाढला.

ज्योतीच्या चौकशीतून असे दिसून आले आहे की, ती पाकिस्तानी गुप्तचर संस्थेच्या संपर्कात होती. ज्योतीने संशयास्पद कारवाया करून आणि शत्रू देश पाकिस्तानच्या एका नागरिकासोबत भारतीय गुप्तचर माहितीची देवाणघेवाण करून भारताचे सार्वभौमत्व, एकता आणि अखंडता धोक्यात आणण्याचा गुन्हा केला आहे. त्यामुळे त्याला भारत सरकारने हेरगिरीच्या आरोपाखाली पर्सोन-नॉन-ग्राटा घोषित केले आहे.

दानिश या अधिका-याशी संपर्क वाढल्यानंतर ज्योती दोनदा पाकिस्तानला गेली आणि दानिशच्या सल्ल्यानुसार तिथे अली अहवानला भेटली. अली अहवानने पाकिस्तानात त्याच्या राहण्याची आणि प्रवासाची व्यवस्था केली. अली अहवानने ज्योतीची ओळख पाकिस्तानी सुरक्षा आणि गुप्तचर अधिकाऱ्यांशी करून दिली. या काळात ती शाकीर आणि राणा शाहबाज नावाच्या दोन लोकांनाही भेटली. कोणालाही संशय येऊ नये, म्हणून तिने शाकीरचा मोबाईल नंबर जाट रंधावा या नावाने सेव्ह केला होता.

## पालिका निवडणुकीसाठी भाजपाचा 'मास्टर प्लॅन'

### इच्छुक उमेदवारांची वाट खडतर

● **पुणे । वीरभूमी–**


स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांच्या आत घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर पुणे पालिका निवडणुकीसाठी भाजपने जय्यत तयारी सुरू केली आहे. अशातच, भाजपाचा मास्टर प्लॅन समोर आला आहे. तसेच लोकसभेचीच रणनीती महापालिका निवडणुकीत वापरण्यात येणार आहे. त्यामुळे पक्षाचे जुने, अनुभवी आणि माजी नगरसेवक असलेले अनेक यंदाच्या निवडणुकीत डावलले जाण्याची शक्यता आहे. तसेच भाजपा नव्या चेहऱ्यांना संधी देणार असल्याच्या अनेक चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहेत. पालिका निवडणुकीसाठी भाजपामध्ये मोठ्या प्रमाणात इच्छुकांची गर्दी असल्याचे पाहावयला मिळत आहे. एका उमेदवारीसाठी चार ते पाच इच्छुक प्रत्येक ठिकाणी आहेत. त्यामुळे या इच्छुकांमधून योग्य उमेदवार निवडण्यासाठी भाजपाकडून विविध पातळ्यांवर सर्वेक्षण करण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. हे सर्वेक्षण करण्यासाठी संस्थेची देखील नेमणूक करण्यात आली आहे.

तसेच मिळालेल्या माहितीनुसार, हे सर्वेक्षण तीन स्तरावर करण्यात येणार आहे. केंद्रीय, प्रदेश पातळी आणि संघटनात्मक. त्यामुळे उमेदवारी मिळवण्यासाठी इच्छुकांना मोठ्या आव्हानांना सामोरे जाव लागणार आहे. विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाने उमेदवारी निश्चित करण्यासाठी अशाच प्रकारची रणनीती आखण्यात आली होती. त्याचप्रमाणे आता हाच फॉर्म्युला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठीदेखील वापरण्यात येणार आहे.

महापालिकेच्या निवडणुका येत्या चार-पाच महिन्यांत होणार आहे. त्यासाठी सर्वच पक्षांनी तयारी सुरू केली आहे. आगामी निवडणुका या महाविकास आघाडी आणि महायुती म्हणून लढल्या जाणार की स्वबळाचा याचा ठोस निर्णय अद्याप झालेला नाही. पण कार्यकर्ते, पदाधिकारी कामाला लागले आहेत. दरम्यान नुकतेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुणे दौऱ्यावर होते. या दौऱ्यादरम्यान, भाजपाचे अध्यक्ष धीरज घाटे यांनी पदाधिकाऱ्यांसह मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी त्यांना कामाला लागा, अशा सूचना दिली आहे. पालिका निवडणुकांची पार्टीने जोरात तयार केली पाहिजे, आपला महापौर महापालिकेत बसला पाहिजे अशा पद्धतीने कामाला लागा असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# परळीत कराडची बी गँग ॲक्टिव्ह!

## शिवराज दिवटेला मारहाण करणारे त्यांचेच लोक आ. धस यांचा दावा



● **परळी । वीरभूमी –**

परळीत शुक्रवारी शिवराज दिवटे नावाच्या तरुणाला दहा ते बारा जणांच्या टोळक्याने बेदम मारहाण केली. अपहरण करून एका टेकडीवर नेत त्याला पट्टा, लोखंडी रॉड आणि काठीने मारहाण करण्यात आली. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण खूनाची दहशत अद्याप कायम आहे. त्यात पुन्हा एका तरुणाचे अपहरण करून त्याला मारहाण आणि तुझा संतोष देशमुख पार्ट टू करू, अशी दिलेली धमकी यामुळे या प्रकरणाला वेगळे वळण लागले आहे. आमदार सुरेश धस यांनी हे त्यांचेच लोक आहेत असे म्हणत वाल्मीक कराड गँगकडे बोट दाखवले आहे.

वाल्मीक कराड जेलमध्ये असला तरी त्यांची बी गँग परळी आणि बीड जिल्ह्यात अजूनही ॲक्टिव्ह आहेच. महाकालचे भस्म आणि कपाळावर गंध लावणारे हे त्यांचेच पोरं आहेत. शिवराज दिदवटेला मारहाण करत संतोष देशमुख पार्ट टू करण्याचाच त्याचा प्रयत्न होता, तसं त्यांनी बोलूनही दाखवले आहे. पण दिवटे थोडक्यात वाचला असे म्हणत सुरेश धस यांनी पुन्हा एकदा परळीतील गँगवार आणि त्यांच्या आकांचा उल्लेख करत या प्रकरणातील आरोपी आणि वाल्मीक कराड गँगचे संबंध असल्याचे सूचित केले आहे.

शिवराज दिवटे याला अपहरण करून जीवे मारण्याचा प्रयत्न शुक्रवारी झाला. या मारहाणीचे व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. शिवाय दिवटे यांने आरोपींनी मारहाण करतांना तुझा संतोष देशमुख पार्ट टू करू, अशी धमकी दिल्याचे सांगितले. या पार्श्वभूमीवर आज बीड-परळी रोडवरील गोपीनाथ गड रस्त्यावर लिंबोटा ग्रामस्थांनी आरोपींवर मकोका लावण्याची मागणी करत रास्तारोको केला. तर मराठा संघटनांकडून बीड बंदची हाकही देण्यात आली.

दरम्यान, आमदार सुरेश धस यांनी या प्रकरणावर भाष्य करताना आरोपींचे वाल्मीक कराड व इतर नेत्यांसोबत फोटो आल्याचा दावा केला. हे त्यांचेच लोक आहेत, वाल्मीक कराडी बी गँग जिल्ह्यात ॲक्टिव्ह आहे. शिवराज दिवटे याचा संतोष देशमुख होता होता राहिला, असे सांगत या महाकाल टोळीचा बंदोबस्त करावा लागेल, असेही धस म्हणाले.

काल धनंजय देशमुख शिवराज दिवटे याची अंबाजोगाईच्या शासकीय रुग्णालयात जाऊन भेट घेतली होती. ही मारहाण आणि दिवटेला देण्यात आलेली धमकी हा गंभीर प्रकार आहे. ज्या आरोपींनी ही अमानुष मारहाण केली ते कोणाच्या जवळचे आहेत, हे सूर्यप्रकाशा इतके स्पष्ट आहे, असे सांगत धनंजय देशमुख यांनीही आरोपींचा वाल्मीक कराड गँगशी संबंध असल्याचे सूचक विधान केले होते. तर दुसरीकडे या प्रकरणातील आरोपी कोणत्या कोणत्या समाजाचे आहेत, हे सांगत याला जातीय रंग न देण्याचे आवाहन बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी केले होते.

## परळीत ३ दशकांची सत्ता म्हणूनच माज; खा. बजरंग सोनवणेंचा संताप

● **बीड । वीरभूमी–**

शिवराज दिवटे या युवकाला अपहरण करून मारहाण झाल्यानंतर बीड जिल्ह्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापले आहे. तुझा संतोष देशमुख पार्ट टू करू, अशी धमकी मारहाण करणा-या आरोपींनी दिल्यानंतर या प्रकरणाला वेगळेच वळण लागले आहे. बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी आज शिवराज दिवटे याची रुग्णालयात जाऊन भेट घेतली. त्यानंतर त्याचा वडीलांशीही त्यांनी चर्चा केली.

परळीत १९९२ पासून एकहाती सत्ता असल्याने या सत्तेचाच हा माज असल्याची संतप्त प्रतिक्रिया सोनवणे यांनी दिली. या अपहरण आणि हल्ला प्रकरणातील फरार आरोपींना तातडीने अटक करा, अशी मागणी करतानाच पोलिस अधीक्षक दर्जाचा एक विशेष अधिकारी आणि कर्मचारी या प्रकरणाच्या चौकशीसाठी द्या, यासाठी आपण मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांना भेटणार असल्याचे सोनवणे यांनी माध्यमांना सांगितले. शुक्रवारी परळीतील गुन्हेगारांच्या एका टोळक्याने शिवराज दिवटे या तरुणाला उचलून जवळच्या जंगलात नेते लाठ्याकाठ्या, बेल्ट, रॉडने बेशुद्ध होईपर्यंत बेदम मारहाण केली.

परळीजवळील रत्नेश्वर मंदिराच्या आवारातील जंगलात हा प्रकार घडला. दहा ते बारा जणांच्या टोळक्याने ही मारहाण केली, त्याचा व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल केला. गंभीर जखमी अवस्थेत त्याला उपचारासाठी आंबाजोगाईतील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. खासदार बजरंग सोनवणे यांनी शिवराज दिवटे याची आज भेट घेतली. तसेच त्याच्या वडिलांशी देखील चर्चा केली.

## SPOT NEWS

### दीघी सोसायटीच्या अध्यक्षांसह चार संचालक पाच वर्षांसाठी अपात्र

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

नेवासा तालुक्यातील राजकीयदृष्ट्या महत्त्वाची समजली जाणारी दिघी विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेच्या (सोसायटी) अध्यक्षांसह चार संचालकांना पाच वर्षांसाठी अपात्र ठरविण्याची कारवाई करण्यात आली आहे. सहकार विभागाचे सहायक निबंधक देविदास घोडेचोर यांनी हा आदेश दिला. सेवा संस्थेचे अध्यक्ष सोपान अंबादास नागवडे, संचालक शोभा सुनील निकम, दत्तात्रय रामराव दळवी व मच्छिंद्र रावसाहेब गवळी या चार जणांना पाच वर्षांसाठी अपात्र ठरविण्यात आले आहे. या संदर्भात देविदास नागवडे यांनी, दि. १७ फेब्रुवारी २०२५ रोजी सहायक निबंधकांकडे लेखी तक्रार केली होती. सोपान नागवडे, शोभा निकम, दत्तात्रय दळवी व मच्छिंद्र गवळी हे चार संचालक दि. ३० जून २०२४ अखेरपर्यंत थकबाकीदार होते. सहकारी संस्था कायद्यानुसार थकबाकीदार व्यक्ती निवडणुकीसाठी उमेदवार वा मतदार म्हणून अपात्र ठरते. परंतु या थकबाकीदारांनी २५ मार्चला झालेल्या संस्थेच्या निवडणुकीत भाग घेतला. सोपान नागवडे अध्यक्षपदी निवडून आले, याकडे तक्रार अर्जात लक्ष वेधण्यात आले. याशिवाय संस्थेच्या निवडणुकीच्या दिवशीच संपत ब्राह्मणे, शिवाजी निकम व इतर संचालकांनीही आक्षेप घेत सहायक निबंधकांकडे चौघांविरुद्ध अर्ज दाखल केला होता. त्याची दखल घेत सहायक निबंधकांनी सुनावणी घेतली. संबंधित संचालकांचा जबाब नोंदवून घेत चौकशी करून वरील चार संचालकांना पाच वर्षांसाठी अपात्र करण्याचा आदेश दिला. दिघी सेवा संस्थेमध्ये एकूण १३ संचालक आहेत. त्यांपैकी चार जण अपात्र झाल्याने सोसायटीच्या सत्तेतही बदल होण्याची शक्यता वर्तवली जाते. त्यामुळे नेवासे तालुक्यातील राजकीय व सहकार वर्तुळात घडामोडींची चर्चा सुरू झाली आहे.

### डॉ. बोरगेप्रकरणी न्यायालयात हरकत घेणार; आयुक्त डांगे यांची माहिती

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

आरोग्य विभागातील अपहार प्रकरणातील गुन्ह्यातून डॉ. अनिल बोरगे यांचे नाव वगळण्याबाबत पोलीस प्रशासनाने न्यायालयात दाखल केलेल्या पत्राला महानगरपालिकेमार्फत कायदेशीर हरकत व आक्षेप घेतला जाणार आहे. गुन्ह्यातून त्यांचे नाव वगळण्याचा निर्णय अद्याप न्यायालयाने दिलेला नाही. याप्रकरणी महानगरपालिका न्यायालयात योग्य ती भूमिका मांडेल, अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली आहे. दरम्यान, डॉ. बोरगे यांनी स्वतःच हा अपहार उघड केल्याचा दावा ते करत असतील, तर आरोग्य विभागाचे जबाबदार अधिकारी व विभागप्रमुख म्हणून त्यांनी गुन्हा का दाखल केला नाही? अद्याप अपहरणाची रक्कम वसूल का झाली नाही? डॉ. बोरगे यांनी दीड वर्ष यावर मौन का बाळगले? त्यांना आत्ताच पश्चातापबुद्धी कशी सुचली? असे सवालही आयुक्त डांगे यांनी उपस्थित केले आहेत. आरोग्य विभागातील १६.५० लाखांच्या अपहार प्रकरणी पोलिसांनी तपास करून त्यात डॉ. बोरगे यांच्या विरोधात पुरावे नसल्याचे म्हटले आहे. प्रत्यक्षात खात्यातील व्यवहाराबाबत दोघांची जबाबदारी आहे. निधी वापराबाबत तत्कालीन शहर लेखा व्यवस्थापक विजयकुमार रणदिवे याने निधी वर्ग करण्याबाबत त्यांच्या यूजर आयडीवरून केलेल्या कार्यवाहीला अथवा प्रस्तावाला विभाग प्रमुख म्हणून डॉ. बोरगे यांनी त्यांच्या आयडीवरून मंजुरी दिल्यावर खात्यावरील व्यवहार होणे अपेक्षित आहे. मात्र, बोरगे यांनी यात विभागप्रमुख म्हणून निष्काळजीपणा व हलगर्जीपणा केला आहे. रणदिवे यानेच दोन्ही युजर आयडी वापरून पैसे वर्ग केले.

# मैलामिश्रित पाणीपुरवठ्यामुळे शहरातील नागरिक त्रस्त

## आठ दिवसांत उपाय न झाल्यास महापालिकेसमोर मटका फोड आंदोलनाचा इशारा

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

शहरातील सूर्यनगर परिसरातील रहिवासी मागील पाच ते सहा महिन्यांपासून दूषित व मैलामिश्रित पाणीपुरवठ्यामुळे त्रस्त झाले आहेत. या दूषित पाण्यामुळे परिसरात उलटी, जुलाब, गॅस, कावीळ यांसारख्या आजारांनी नागरिकांना ग्रासले आहे. या गंभीर समस्येबाबत महापालिकेकडे वारंवार तक्रारी करूनही अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही, असा आरोप रहिवाशांनी केला आहे.



या पार्श्वभूमीवर भाजपच्या माजी नगरसेविका सौ. पल्लवीताई जाधव यांच्या नेतृत्वाखाली महिलांच्या शिष्टमंडळाने महापालिकेचे उपायुक्त डॉ. विजयकुमार मुंडे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. स्वच्छ पाणीपुरवठा लवकरात लवकर सुरू करावा, अशी मागणी करण्यात आली. आठ दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास महापालिकेसमोर मटका फोड आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.



यावेळी बोलताना पल्लवीताई जाधव म्हणाल्या, महापालिकेचा हा दुजाभाव नागरिकांच्या आरोग्यावर घातक ठरत आहे. आम्ही निवडून आलो नाही तरी जनतेच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरण्याची आमची तयारी आहे. महिलांना स्वयंपाकासाठी, पिण्यासाठी अस्वच्छ पाणी वापरावे लागते, ही लाजिरवाणी बाब आहे. जर प्रशासनाने वेळेत उपाययोजना केली नाही, तर नागरिकांसह महापालिकेसमोर तीव्र आंदोलन छेडले जाईल आणि त्याची सर्व जबाबदारी प्रशासनावर असेल.

विशेष म्हणजे, महापालिकेने पाणीपट्टीमध्ये वाढ केली असताना नागरिकांना अस्वच्छ पाणी प्यावे लागत आहे. जोपर्यंत स्वच्छ पाणीपुरवठा होत नाही, तोपर्यंत पाणीपट्टी भरणार नाही, असा ठाम निर्णय नागरिकांनी घेतला आहे.

या निवेदनप्रसंगी सौ. शिला तळेकर, सौ. सुवर्णा फुंदे, सौ. आरती खताडे, सौ. चौधरी, सौ. रूपाली शिंदे आदी महिला उपस्थित होत्या.

## महात्मा फुले विद्यालयाची गायत्री देशमुख तालुक्यात प्रथम



**● अकोले । वीरभूमी–**

श्री अगस्ति एज्युकेशन सोसायटी या संस्थेच्या महात्मा फुले विद्यालय सुगाव बु या विद्यालयाने निकालाची परंपरा राखत विद्यालयाची विद्यार्थीनी कु गायत्री महेंद्र देशमुख हिने एसएससी परीक्षेत ९८.६० गुण मिळवत तालुक्यात प्रथम येण्याचा मान मिळवला.

विद्यालयाचा शेकडा निकाल १०० टक्के लागला असून तालुक्यात प्रथम, तृतीय, चतुर्थ येण्याचा बहुमान महात्मा फुले विद्यालयास मिळाला असून संस्थेच्या विविध विद्यालयातील विद्यार्थी पहिले पाच क्रमांक मिळवून यशस्वी झाले आहेत.

महात्मा फुले विद्यालयाच्या यशात बहुमोल कामगिरी करून विद्यालयात प्रथम कु. गायत्री महेंद्र देशमुख ९८.६०, द्वितीय कु. वाकचौरे संस्कृती सुनिल हिने ९५.६०, तृतीय श्रुती ज्ञानेश्वर शिंदे ९५.२०, चतुर्थ कु. ईश्वरी राजेंद्र पवार ९४.८० व पाचवा क्रमांक कु गौरी किरण भांगरे ९२.२०% गुण मिळवले. तालुक्यात तृतीय क्रमांक मिळविण्याचा याच विद्यालयातील कु संस्कृती सुनिल वाकचौरे तर तालुक्यात चतुर्थ कु. श्रुती ज्ञानेश्वर शिंदे हिने मिळवला.

या यशाबद्दल संस्थेच्या सेक्रेटरी शैलजा पोखरकर, अध्यक्षा माधुरी वाकचौरे, कार्याध्यक्ष शिरीष नाईकवाडी, सतीश नाईकवाडी, संदीप नाईकवाडी, सुगावच्या सरपंच डॉ. अनुप्रीता शिंदे, उपसरपंच महेश देशमुख, ग्रामपंचायत सर्व सदस्य, वाशेरे, मनोहरपूर ग्रामपंचायत, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, पंचायत समिती शिक्षण विभाग व पालकवर्ग यांचेकडून विद्यालयाचे मुख्याध्यापक सिताराम पाथवे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांचे अभिनंदन केले आहे. महात्मा फुले विद्यालयाची विद्यार्थीनी कु. गायत्री देशमुख हिने गुणांचा उच्चांक गाठत कला, क्रीडा आदी क्षेत्रात आपले नैपुण्य सिद्ध केली आहे.

## पारनेर आगारात नवीन पाच लालपरी दाखल; आ. काशिनाथ दाते यांच्या हस्ते लोकार्पण

**● पारनेर । वीरभूमी–**

सर्वसामान्य माणसाच्या रोजच्या प्रवासामध्ये महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ हा महत्त्वाचा घटक आहे. ग्रामीण भागातील प्रवाशांसाठी एस. टी. अविभाज्य भाग आहे. याच ग्रामीण भागातील प्रवाशांसाठी वेळेवर सुरक्षित आणि सुखकर प्रवास व्हावा यासाठी पारनेर आगारात नवीन ५ एस.टी. बसेस देण्यात आल्या असून या बसेसचे लोकार्पण आ. काशिनाथ दाते यांच्या हस्ते रविवारी सकाळी करण्यात आले.



पारनेर तालुक्यातील सार्वजनिक प्रवासी वाहतूक सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या पारनेर आगाराकरिता २५ नवीन बसेसची मागणी परिवहन मंत्री ना. प्रतापराव सरनाईक यांच्याकडे आ. काशिनाथ दाते यांनी केली होती. सदर बसेस टप्याटप्याने देण्यात येतील असे आश्वासन देण्यात आले होते. त्या नुसार प्रथम पाच नवीन बस पारनेर आगाराला उपलब्ध झाल्या आहेत. या बसेसचे आमदार दाते यांनी सपत्नीक पूजन करून लोकार्पण केले.

यावेळी आ. काशिनाथ दाते म्हणाले की, परिवहन मंत्री यांच्याकडे नवीन २५ बसेसची मागणी केली होती. त्यापैकी आज पाच बस उपलब्ध झाल्या असून पुढील टप्प्यात ५ बस लवकरच आगाराला प्राप्त होणार आहेत. उर्वरित १५ बस मिळणेसाठी पाठपुरावा करणार आहे. तसेच पारनेर व सुपा आगाराच्या विस्तारीकरणासाठी शासन दरबारी पाठपुरावा सुरु आहे, त्यालाही लवकरच यश मिळेल. भौगोलिक दृष्ट्या पारनेर सारख्या विस्तीर्ण तालुक्यासाठी बसेसची संख्या वाढणे गरजेचे असल्याचे सांगितले.

यावेळी आगार प्रमुख व एस टी कर्मचारी यांनी आमदार दाते यांचे सत्कार करून आभार मानले. याप्रसंगी पारनेर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विक्रमसिह कळमकर, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंत चेडे, नगरसेवक युवराज पठारे, नगरसेवक अशोक चेडे, कांतीलाल ठाणगे, नारायणगव्हानचे माजी सरपंच सुरेश बोरुडे, रामदास दाते, मंगेश दाते, राजेंद्र औटी, आगराप्रमुख कुसकर साहेब, आबासाहेब मते, शांताराम तराळ, दुधाडे सर व एस टी कर्मचारी उपस्थित होते.

## झेंडीगेटच्या कत्तलखान्यावर गुन्हे शाखेचा छापा; सहा गोवंशीय जनावरांची सुटका; दोघे ताब्यात

**● नगर । वीरभूमी –**

झेंडीगेट परिसरातील एका कत्तलखान्यावर स्थानिक गुन्हे शाखेने छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत सहा गोवंशीय जनावरांची सुटका करत, ४०० किलो गोमांस व अन्य मुद्देमाल असा दोन लाख ६० हजार २०० रूपयांचा माल जप्त करण्यात आला. घटनास्थळावरून एक जण पसार झाला आहे.

गुन्हे शाखेला मिळालेल्या माहितीच्या आधारे, झेंडीगेटमधील भा. कुरेशी याने आपल्या राहत्या घराजवळ काही इसमांच्या मदतीने गोवंशीय जनावरांची कत्तल करण्याची तयारी केली होती. त्यानुसार, पोलिसांनी पंचासमक्ष छापा टाकला असता, तीन इसम कत्तलीच्या हालचालीत असल्याचे दिसून आले. पोलिसांच्या आगमनाची चाहूल लागताच त्यातील एक इसम पळून गेला. पोलिसांनी सलीम मुसा शेख (३०, रा. कोठला, घासगल्ली) व जहीद समद कुरेशी (२०, रा. व्यापारी मोहल्ला) यांना ताब्यात घेतले. पळून गेलेल्या इसमाचे नाव असिफ खालीद कुरेशी (रा. व्यापारी मोहल्ला, झेंडीगेट) असे असल्याचे ताब्यात घेतलेल्या संशयितांनी सांगितले. पोलिसांनी ताब्यातील दोघांकडे चौकशी केली असता, ही जनावरे भा. कुरेशी (पूर्ण नाव माहिती नाही, रा. झेंडीगेट) याच्या मालकीची असल्याचे व ती कत्तलीसाठीच आणल्याची कबुली दिली. पोलिसांनी याठिकाणी केलेल्या कारवाईत ४०० किलो गोमांस, एक लोखंडी सुरा, दोन गोवंशीय जिवंत जनावरे, चार गोवंशीय वासरे असा एकूण दोन लाख ६० हजार २०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी संबंधित संशयित आरोपींविरोधात कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार गणेश भिंगारदे, संतोष खैरे, बाळासाहेब नागरगोजे, अशोक लिपणे, शिवाजी ढाकणे आणि भगवान थोरात यांच्या पथकाने केली.

भिंगार पोलिसांनी मुकुंदनगर, दर्गा दायरा येथे एक जण गोवंशीय जनावरांचे मांस विक्री करताना आढळून आला. भिंगार कॅम्प पोलिसांनी छापा टाकून ही कारवाई केली. शब्बीर कासम कुरेशी (वय ५७, रा. सुभेदार गल्ली, झेंडीगेट) असे त्याचे नाव आहे. कुरेशी याच्या ताब्यातून पोलिसांनी ६० हजार रूपये किंमतीचे २४० किलो गोमांस जप्त केले. पोलीस अंमलदार दीपक शिंदे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल केला आहे. सहायक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांच्या मार्गदर्शनाखाली अंमलदार शिंदे, पी. ए. बारगजे यांनी ही कारवाई केली.

# कोळ नदीवरील बंधाऱ्याचे जलपूजन

## नागरीकांनी जलपूजन करून मानले आ. आशुतोष काळेंचे आभार

**● कोपरगाव । वीरभूमी –**

तालुक्याच्या पूर्व भागातील गोधेगाव-घोयेगाव, धोत्रा, आपेगाव, तळेगाव आदी गावातील शेतकऱ्यांसाठी वरदान असलेला गोधेगाव-घोयेगावच्या कोळ नदीवरील बंधारा गोदावरी डाव्या कालव्याच्या माध्यमातून भरला असून त्याबद्दल लाभार्थी गावातील शेतकऱ्यांनी व नागरीकांनी आ.आशुतोष काळे यांचे आभार मानून बंधाऱ्याच्या पाण्याचे विधिवत पूजन केले आहे.



चालू वर्षीच्या तीव्र उन्हामुळे भू-गर्भातील पाणी पातळी मोठ्या प्रमाणात खालावली आहे. कोपरगाव तालुक्याच्या पूर्व भागात देखील काही प्रमाणात पाणी टंचाई जाणवत असल्यामुळे नागरिकांच्या व जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली होती. त्यामुळे गोदावरी डाव्या कालव्याला सुरु असलेल्या उन्हाळी आवर्तनातून गोधेगाव-घोयेगावच्या कोळ नदीवरील बंधारा भरून मिळावा अशी मागणी गोधेगाव, घोयेगाव, धोत्रा, आपेगाव, तळेगाव आदी गावातील शेतकऱ्यांनी व नागरीकांनी आ.आशुतोष काळे यांचेकडे केली होती. त्या मागणीची दखल घेवून आ. आशुतोष काळे यांनी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना त्याबाबत सूचना करून डाव्या कालव्यातून गोधेगाव-घोयेगावच्या कोळ नदीवरील बंधाऱ्यात पाणी सोडण्याच्या सूचना केल्या होत्या. त्या सूचनेनुसार कोळ नदीवरील बंधाऱ्यात पाणी सोडण्यात आले असून हा बंधारा रविवार (दि.१८) रोजी पूर्ण क्षमतेने भरला आहे. त्याचा फायदा गोधेगाव-घोयेगाव, धोत्रा, आपेगाव, तळेगाव या गावातील ग्रामपंचायत विहिरी, शेतकऱ्यांना होणार असून भू-गर्भातील पाणी पातळी वाढण्यास मोठी मदत होणार आहे. या बंधाऱ्याच्या पाण्याचे गोधेगाव, घोयेगाव, धोत्रा, आपेगाव, तळेगाव आदी गावातील शेतकऱ्यांनी व नागरीकांनी रविवार रोजी पूजन केले आहे.

आ. आशुतोष काळे यांच्या मुळे २०१९ पासून सातत्याने गोधेगाव-घोयेगावच्या कोळ नदीवरील बंधारा भरत आहे. याहीवर्षी हा बंधारा भरल्यामुळे शेतकरी व नागरीकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून पूर्व भागातील गोधेगाव-घोयेगाव, धोत्रा, आपेगाव, तळेगाव आदी गावातील शेतकऱ्यांनी व नागरीकांनी आ.आशुतोष काळे यांचे आभार मानले आहे.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# भारतीय सैनिकांच्या सन्मानासाठी पाथर्डीत तिरंगा रॅली

## भाजपा आमदार मोनिका राजळे यांच्या पुढाकाराने रॅलीचे आयोजन । माजी खा. सुजय विखेंची उपस्थिती

**पाथर्डी । वीरभूमी-**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तान विरोधात केंद्र सरकार व भारतीय लष्कराने जोरदार मोहीम उघडून अनेक दहशतवादी तळ उद्धवस्त केले. या लष्करी मोहिमेला ऑपरेशन सिंदुर हे नाव देण्यात आले होते. या यशस्वी मोहीमेच्या समर्थनार्थ आज आमदार मोनिका राजळे यांच्या पुढाकाराने पाथर्डी शहरातून भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली.

ऑपरेशन सिंदूरच्या यशाबद्दल व देशाच्या सैनिकांविषयी देशवासीयांच्या कृतज्ञता युक्त सद्भावना व्यक्त करण्यासाठी आयोजित या तिरंगा रॅलीला शहरवासीयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. देश प्रेमाच्या जोशपूर्ण घोषणांनी वातावरण पूर्णपणे भारावल्यासारखे झाले. सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास वीर सावरकर मैदानावरून रॅलीला प्रारंभ करण्यात आला. यावेळी माजी खासदार डॉ. सुजय विखे, आमदार मोनिका राजळे, माजी नगराध्यक्ष अभय आव्हाड भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, बाळासाहेब महाडीक, तालुका अध्यक्ष धनंजय बडे, मुकुंद गर्जे, अमोल गर्जे, प्रशांत शेळके, अजय भंडारी, डॉ. मृत्युंजय गर्जे, बंडू बोरूडे, सतिश गुगळे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष रणजित बेळगे, तहसीलदार डॉ. उद्धव नाईक, पालिकेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे, पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, विस्तार अधिकारी अनिल भवार, हिंदू रक्षा मंचचे नाना पालवे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक, भाजप महिला आघाडीच्या ज्योती शर्मा, काशीबाई गोल्हार, सुरेखा गोरे, माजी सैनिक संघटनेचे गोवर्धन गर्जे, रोहिदास एडके, रॅलीचे दक्षिण जिल्हा संयोजक सुभाष गायकवाड आदींसह विविध संस्थांचे पदाधिकारी, पोलीस दल, होमगार्ड संघटना, शिक्षक संघटना, सामाजिक, स्वयंसेवी, संस्थांचे पदाधिकारी, व्यापारी संघटनेचे सदस्य, आदी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.





राष्ट्रीय सेवा योजना, एनसीसी, महिला बचत गट पदाधिकारी, रॅलीमध्ये सहभागी झाल्याने भव्यता वाढली. सैनिक, भारत माता, तिरंगा ड्रेस अशा वेशभूषेमधील विद्यार्थ्यांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. विविध चौकांमध्ये देशभक्तीपर गाणे वाजवण्यात आली. रॅली पाहण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा नागरिकांनी गर्दी करत प्रोत्साहन दिले. माजी सैनिकांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

मिरवणूक मार्गावर कोरडगाव चौकात सीए. गौतमी खाटेर परिवार, मेन रोडवर लालकृष्ण पतसंस्था आदींच्या वतीने पिण्याचे पाणी पुरविण्यात आले. मंत्री परिवाराच्या वतीने माजी सैनिक, एनसीसी कॅप्टन, प्रशासन प्रतिनिधी व शासन प्रतिनिधी यांचा सन्मान करण्यात येऊन रॅलीवर पुष्पवृष्टी करण्यात आली. वनदेव मॉर्निंग वॉक ग्रुपच्या सदस्यांनी रॅली मार्गावर विशेष सहकार्य केले. तालुका खरेदी विक्री संघाच्या वतीने अध्यक्ष संदीप पठाडे व सर्व संचालकांनी रॅलीतील सहभागी सर्वांना अल्पोपहार वितरण केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी नगराध्यक्ष डॉ. मृत्युंजय गर्जे, सूत्रसंचालन राजीव सुरवसे तर आभार मोनिका राजळे यांनी मानले.

नगर ग्रामीण विभागातील सर्वांत भव्य रॅली म्हणून प्रमुख पाहुण्यांनी भाषणातून कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल कौतुकाने उल्लेख केला. रॅली मार्गावर पोलीस दलाच्या वतीने सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी तांबे, पोलीस उपनिरीक्षक महादेव गुट्टे, विलास जाधव आदींच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी चोख नियोजन केले.

# संजीवनी इंजिनिअरींगच्या सहा विद्यार्थ्यांना मिळाल्या बहुराष्ट्रीय वित्तीय कंपनीमध्ये नोकऱ्या



**कोपरगाव । वीरभूमी-**

संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट (टी अँड पी) विभागाच्या व कॉम्प्युटर इंजिनिअरींग आणि इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी विभागातील शिक्षकांच्या प्रयत्नाने बहुराष्ट्रीय वित्तीय कंपनीने घेतलेल्या मुलाखतींमध्ये तीन विद्यार्थ्यांची प्रत्येकी २७ लाख रुपये वार्षिक पॅकेजवर, तीन विद्यार्थ्यांची प्रत्येकी २१ लाख रुपये, एकाची १६ लाख रुपये, एकाची ९ लाख रुपये तर एकाची ८ लाख रुपये वार्षिक पॅकेजवर नोकऱ्यांसाठी निवड झाली. असे एकुण नऊ विद्यार्थी कंपनीने नोकरीसाठी निवडले, अशी माहिती संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

### तीन विद्यार्थ्यांना २७ लाख व तीन विद्यार्थ्यांना २१ लाखांचे वार्षिक पॅकेज

पत्रकात पुढे म्हटले आहे की राहुल कैलास जगधने, वैष्णवी सचिन मोहाडकर व प्रथमेश संतोष सोनवणे यांची वार्षिक पॅकेज रू २७ लाखांवर निवड झाली. यशोदिप सुधिर भामरे, ज्ञानेश्वरी विजयराज डोळझाके व ऋषिकेश राजेंद्र वाबळे यांची वार्षिक पॅकेज रू२१ लाखांवर निवड झाली. संकेत श्रीराम दवंगे याची रू १६ लाख वार्षिक पॅकेजवर निवड झाली. प्रणव विक्रमादित्य गाडे व विनित हर्षद जोशी यांची अनुक्रमे रू ९ लाख व रू ८ लाख वार्षिक पॅकेजवर निवड झाली.

श्री कोल्हे यांनी पत्रकात पुढे म्हटले आहे की अनेक उद्योगांना आधुनिक तंत्रज्ञान अवगत असलेले अभियंते मिळत नाही, तर अनेक अभियंत्यांना चांगल्या पगाराच्या नोकऱ्या मिळत नाही, हे वास्तव संस्थेचे संस्थापक, माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी जानले. ही विसंगती दुर करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री नितिनदादा कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजने शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासुन ऑटोनॉमस दर्जा प्राप्त केला आणि नामांकित उद्योगांना अभिप्रेत असलेल्या आधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश अभ्यासक्रमात केला. त्याचा चांगला परीणाम प्लेसमेंटसाठी पहिल्या ऑटोनॉमस बॅच पासुन दिसत आहे. ग्रामिण भागातील मुला मुलींना सरकारी आस्थापना किंवा नामांकित कंपन्यांमध्ये चांगल्या पगाराच्या नोकऱ्या मिळाव्यात, काहींनी स्वतः चे उद्योग सुरू करून इतरांच्या हातांना काम द्यावे, या हेतुने सुमारे ४२ वर्षांपूर्वी संजीवनी शैक्षणिक संकुलाची स्थापना स्व. कोल्हे यांनी केली. त्यांची दूरदृष्टीता सातत्याने सिध्द होत आहे.

संजीवनीचे अध्यक्ष नितिनदादा कोल्हे व मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी सर्व निवड झालेल्या सर्व अभियंत्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले.

# महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या विस्तारित राज्य कार्यकारिणीची शहादा येथे बैठक

## अहिल्यानगर जिल्हा कार्याध्यक्ष विष्णू गायकवाड यांची माहिती

**अहिल्यानगर । वीरभूमी -**

शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर स्थापित महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या विस्तारित राज्य कार्यकारिणीची बैठक दि.३१ मे ते १ जून या कालावधीत शहादा (जि. नंदुरबार) येथे होणार असल्याची माहिती अहिल्यानगर जिल्हा कार्याध्यक्ष विष्णु गायकवाड यांनी दिली.



शहादा येथे होत असलेल्या महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या विस्तारित राज्य कार्यकारिणीची बैठकीच्या नियोजनासाठी दि. १५ मे रोजी सांयकाली ७ वाजता अहिल्यानगर जिल्हा समितीच्या पदाधिकाऱ्यांची ऑनलाइन बैठक जिल्हा कार्याध्यक्ष विष्णु गायकवाड यांचे अध्यक्षतेखाली व राज्य प्रधान सचिव ठकसेन गोराणे, राज्य सरचिटणीस ॲड. रंजना गवांदे यांचे प्रमुख उपस्थितित संपन्न झाली.

जिल्हा प्रधान सचिव विनायक सापा व देवदत्त साळवे,प्रसिद्धि व सोशल मीडिया विभाग जिल्हा कार्यवाह सुखदेव फुलारी, बुवाबाजी संघर्ष विभाग जिल्हा कार्यवाह शशिकांत गायकवाड, निधी संकलन विभाग जिल्हा कार्यवाह प्राचार्य अशोक गवांदे,अनिल माने, मल्हारी खेडकर, रामचंद्र जाधव, संतोष माने आदींसह इतर पदाधिकारी या बैठकीस उपस्थित होते.

यावेळी बोलताना विष्णू गायकवाड यांनी सांगितले की, दि.३० मे ते १ जून रोजी शहादा, जि.नंदुरबार येथील पूज्य साने गुरुजी विद्याप्रसारक मंडळ शहादा (लोणखेडा) येथे विस्तारित राज्य कार्यकारणी बैठक होत असल्याचे सांगून महाराष्ट्र अंनिसचे सर्व राज्य कार्यकारिणी पदाधिकारी, निमंत्रित, सर्व जिल्हा कार्याध्यक्ष, जिल्हा प्रधान सचिव आणि शाखा कार्याध्यक्ष, प्रधान सचिव व इच्छुक प्रमुख कार्यकर्ते उपस्थित रहाणार आहेत.

अहिल्यानगर जिल्ह्याचे जिल्हा कार्याध्यक्ष, जिल्हा प्रधान सचिव आणि सर्व शाखांचे कार्याध्यक्ष,सचिव व इच्छुक प्रमुख कार्यकर्ते यांनी पूर्णवेळ उपस्थित राहणे अनिवार्य आहे. सदर बैठक शुक्रवार दि. ३० मे रोजी सकाळी १० वाजता सुरू होईल आणि रविवार दि.१ जून रोजी दुपारच्या भोजनानंतर बैठक संपेल असे सांगून सर्वांनी तीन ही दिवस पूर्ण उपस्थित रहावे असे आवाहन केले.

राज्य प्रधान सचिव ठकसेन गोराणे, राज्य सरचिटणीस ॲड. रंजना गवांदे यांनी ही मार्गदर्शन केले. अनिल माने यांनी प्रेरणा गीत सादर केले. जिल्हा प्रधान सचिव विनायक सापा यांनी प्रस्ताविक केले.

# कामे करुन शिक्षण घेतलेल्या रात्रशाळेतील विद्यार्थ्यांची यशस्वी भरारी अभिमानास्पद

## प्रा. शिरीष मोडक । भाई सथ्था नाईट हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचा दहावी, बारावी बोर्डाच्या परीक्षेतील गुणवंतांचा सन्मान

**नगर । वीरभूमी-**

हिंद सेवा मंडळ संचलित ज्युनियर कॉलेज भाई सथ्था नाईट हायस्कूलच्या एचएससी १२ वी बोर्डाच्या परीक्षेत कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. तर इयत्ता दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेतील रात्रशाळेच्या गुणवत्ता यादीत ४ विद्यार्थिनींनी स्थान मिळवले. दिवसभर काम करुन रात्री शिक्षण घेणाऱ्या या होतकरु विद्यार्थ्यांनी आपल्या जिद्दीने गुणवत्ता सिध्द केली.

मासूम संस्था (मुंबई) यांच्या वतीने राज्यातील रात्रशाळांचे इयत्ता दहावी मधील प्रविष्ट सर्व विद्यार्थ्यांचे मूल्यांकन करण्यात येते. राज्यातील रात्रशाळांमधून प्रविष्ट विद्यार्थ्यांमधून टॉप टेन (१०) विद्यार्थी निवडण्यात येतात यामध्ये चार विद्यार्थी भाई सथ्था नाईट हायस्कूलचे आहेत. दीक्षा गवळी-गायकवाड (८६.८०%) हिने रात्रशाळेतून राज्यात प्रथम येण्याचा बहुमान पटकाविला आहे. मंदा भोराडे-पवार (७६.८०%) यांनी राज्यात पाचवा तर इशिता भोर व जयश्री वैरागर-वाघमारे (७४.४०%) या दोन्हींनी आठवा क्रमांक मिळवला आहे.

या गुणवंत विद्यार्थिनींचा संस्थेच्या वतीने भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, ज्येष्ठ मार्गदर्शक अजितशेठ बोरा, शालेय समितीच्या चेअरमन प्रा.ज्योतीताई कुलकर्णी, माजी चेअरमन डॉ. पारस कोठारी, नाईट हायस्कूलचे प्राचार्य सुनील सुसरे आदी उपस्थित होते.

ज्योतीताई कुलकर्णी म्हणाल्या की, शिक्षणाने नुसती डिग्री मिळत नाही, तर माणसाचा विचार प्रगल्भ होतात. विचार प्रगल्भ झाल्यास तुमच्या वागण्या-बोलण्यात बदल होतो आणि तो विचार तुम्हाला जीवनात पदोपदी निर्णय घेण्यास सक्षम बनवतो. म्हणून शिक्षण फक्त नोकरीसाठी नसून, जीवन घडविण्याचे साधन असल्याचे त्यांनी सांगितले.

शिरीष मोडक म्हणाले की, रात्र शाळेतील महिला विद्यार्थिनींनी उत्तम गुण मिळवणं ही साधी गोष्ट नाही, तर शिक्षणात मोठा खंड पडल्यावर पुन्हा अभ्यासाकडे वळणं हा एक धाडसी निर्णय असतो. घरातील जबाबदाऱ्या, कौटुंबिक अडचणी, सामाजिक बंधनं या सगळ्यांवर मात करत महिला स्वत:ची गुणवत्ता सिध्द करत आहेत. जेंव्हा शिक्षण घेण्याचा दृढ निश्चय घेतला जातो, तेंव्हा यश निश्चितच मिळते. या यशामागे केवळ विद्यार्थिनींचा दृढनिश्चय नाही, तर शिक्षकांनी दिलेले समर्पित मार्गदर्शनही तितकंच मोलाचं आहे. राज्यातील रात्र शाळेत टॉप १० मध्ये ४ विद्यार्थिनींचा समावेश असणं हेच शिक्षकांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे यश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. पारस कोठारी म्हणाले की, रात्र शाळेत शिक्षक तळमळीने आणि समर्पणाने गुणवत्तापूर्ण शिक्षण देतात. कठीण परिस्थितीतही गुरूंनी केलेले मार्गदर्शन हेच विद्यार्थ्यांच्या यशामागचं खरं कारण असतं. म्हणूनच रात्र शाळेतील यश हे खऱ्या अर्थाने गुरूंचेच आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे त्यांनी अभिनंदन केले. तर बारावीनंतर पुढील शिक्षणासाठी सारडा महाविद्यालयात प्रवेश घेण्याचे आवाहन केले.



सर्व यशस्वी विद्यार्थी-विद्यार्थिनींचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले तसेच वर्षभर शैक्षणिक मदत करणाऱ्या मासूम संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी निकिता केतकर, संचालक कमलाकर माने, युवराज बोराडे व एसएससी प्रमुख शशिकांत गवस, गुरुप्रसाद पाटील यांचे प्राचार्य सुनील सुसरे यांनी आभार मानले व शैक्षणिक वर्ष २०२५-२६ यावर्षीचे इयत्ता आठवी ते बारावी कला, वाणिज्य शाखेसह नवीन देणे सुरू झाल्याची माहिती सर्व विद्यार्थी, पालकांना दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली दुराफे यांनी केले. आभार अमोल कदम यांनी मानले.